**<u>नि.फौ.ख.क्र.६६८/२०२२</u>**
<u>निशाणी क्र.१५</u>

# <u>दोषारोप</u>

मी, **एस. ए. विराणी,** प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे खालीलप्रमाणे तुमचेवर दोषारोप ठेवत आहेः–

**विजय प्रकाश गायकवाड,**
वय – ४७ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
राहणार – बंगला साईड, ता. दौंड, जि. पुणे.

पहिले असे की, दिनांक ११.०७.२०२२ रोजी २२.३० वाजेच्या सुमारास मौजे दौंड, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत बंगला साईड पंगी गॅरेज शेजारी जाधव चाळ येथील आरोपी विजय गायकवाड यांचे घरासमोर तुम्ही आरोपीने फिर्यादी नामे महेश विठ्ठल जाधव यांस 'तुझ्या पत्नीने माझी पत्नी मेनका हिला फोन का केला' असे विचारुन तुमची पत्नी मेनका हिला मारहाण करीत असताना फिर्यादीने 'का मारता' असे विचारले असता तुम्ही फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी करुन डोक्यात दगड मारुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

दुसरे असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना मारहाण करुन त्यांना इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ३२३ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

तिसरे असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभणामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे उद्देश ठेवला व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ५०४ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

शेवटी असे की, तुम्ही उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना दमदाटी करुन फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्याद्वारे तुम्ही भा.दं.वि. कलम ५०६ अन्वये शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा गुन्हा केला आहे.

आणि तुम्हास याद्वारे निर्देशित करण्यात येत आहे की, तुमच्या विरुध्द उपरोक्त दोषारोपांवर खटल्याची चौकशी होईल.

**(एस.ए.विराणी)**

दिनांक – १२.०८.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

**<u>दाखला</u>**

प्रमाणित करण्यात येते की, वरील दोषारोपांमधील मजकुर आरोपीस त्याच्या मातृभाषेतून वाचून व समजावून सांगितला.

**(एस.ए.विराणी)**

दिनांक – १२.०८.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.